# शिवाजी विद्यापीठाचा उद्या ६१ वा दीक्षांत समारंभ

**महामहिम राज्यपालांसह उच्च-तंत्रशिक्षणमंत्री राहणार उपस्थित; १४,२६९ विद्यार्थी पदवीने होणार सन्मानित**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षांत समारंभ शुक्रवारी होणार असून, २०२३-२४ वर्षातील राष्ट्रपती सुवर्णपदक जैव रसायनशास्त्र अधिविभागातील विद्यार्थी बंडू राजू कोळी यांना, तर कुलपती सुवर्णपदक मानसशास्त्र अधिविभागातील विद्यार्थिनी क्रिशा अल्पा नोरोन्हा यांना बुधवारी जाहीर करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत याची घोषणा केली.

विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ शुक्रवारी राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात सकाळी ११ वाजता कुलपती तथा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक आशीष लेले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. दीक्षांत समारंभात १४,२६९ विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेणार आहेत.


६१ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीस करण्यात आलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईमुळे परिसर झगमगून गेला आहे.

दरम्यान, ३७ हजार २२३ विद्यार्थ्यांना पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्र पाठवण्यात येणार आहे. विशेष म्हणजे एकूण पदवीप्राप्त स्नातकांपैकी ५५.५३ टक्के विद्यार्थिनी आहेत. यावेळी १६ स्नातकांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. दरम्यान, गुरुवारी सकाळी ८ वाजता ग्रंथदिंडी निघणार आहे. कमला कॉलेज येथून या ग्रंथदिंडीचा प्रारंभ होईल. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव उपस्थित होते.

## डॉक्टरेटने ३८ स्नातक होणार सन्मानित

दीक्षांत समारंभाला प्रत्यक्ष उपस्थित राहून ५८५६ विद्यार्थी, तर ८४१३ विद्यार्थिनी पदवी प्रमाणपत्र स्वीकारणार आहेत. विशेष म्हणजे या समारंभात १८ विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली जाणार आहेत, तर ३८ स्नातकांना डॉक्टरेटने सन्मानित केले जाणार आहे.

## दीक्षांत समारंभाची वैशिष्ट्ये

- नोंदणी केलेल्या ५१,४९२ विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन स्वीकारले.
- यावेळी प्रथमच द्विभाषिक पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार
- अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना संयुक्त पदवी प्रमाणपत्रे प्रदान

epaper : www.sindhudurgsamachar.com

Mahrashtra : 9422043543 Goa : 9673153300 Karnataka : 9422043300

# सिंधुदुर्ग समाचार

ऐकत रहा Mango FM 90.4

संस्थापक संपादक : भाऊसाहेब कदम

कोल्हापूर

Posted at RMS Kolhapur Postal Reg No : KLR/170/2024-2026

● गुरूवार दि.१६ जानेवारी २०२५ ● पाने ४ ● वर्ष ३४ ● अंक ३२४ ● कोल्हापूर, सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, सांगली, सातारा, बेळगाव, गोवा येथून प्रसिध्द ● e-mail: klpsindhu@gmail.com ● RNI NO : MAHMAR/2006/17335 ● किंमत १ ●




६१ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीस आकर्षक विद्युतरोषणाई करण्यात आली आहे. त्याचे छायाचित्र टिपले आहे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी.

16 JAN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ परिसर प्रकाशमय...



कोल्हापूर : येथे ६१ व्या दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीवर केलेली आकर्षक विद्युत रोषणाई. या विद्युत रोषणाईने विद्यापीठ परिसर उजळला. (छाया: रियाज ट्रेनर)

16 JAN 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : दीक्षान्त समारंभानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या इमारतीला करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई.

(छाया : मिलन मकानदार)

16 JAN 2025 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# दीक्षांत समारंभाची तयारी पूर्ण

## पदवी प्रमाणपत्र छपाईला वेग : मंडप, पदवी प्रमाणपत्र स्टॉल उभारणी पूर्ण

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ उद्या (दि. १७) रोजी राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. प्रमुख पाहुणे पुणे येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा संचालक डॉ. आशिष लेले आहेत. विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहातील दीक्षांत समारंभात गोल्ड मेडल व पीएच.डी. आणि एम. फिल.च्या प्रमाणपत्राचे वाटप केले जाणार आहे. त्यादृष्टीने विद्यापीठाने जय्यत तयारी केली आहे. स्वागत कमान मंडप व पदवी प्रमाणपत्र स्टॉलची उभारणी केली आहे. तर आज (दि. १६) सकाळी ७ वाजता ग्रंथदिंडी तर सकाळी वाजता ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होणार आहे.

केंद्र शासनाच्या आदेशानुसार दीक्षांत समारंभाला कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, परीक्षा संचालक, डीन आणि प्रमुख पाहुणे यांनी पांढरा पायजमा व कुर्ता तर महिलांनी मोती कलरची साडी त्यावर जॅकेट, गळ्यात मानवस्त्र परिधान करायचा आहे. या सर्व गोष्टींची संपूर्ण तयारी करण्यात आली आहे. मंडप उभारणी सुरू असून प्रत्येक शाखेनुसार पदवी प्रमाणपत्र वितरण करण्याचे स्टॉल उभारले आहेत. तसेच ग्रंथ व खाद्य पदार्थांच्या विक्रीचे स्टॉलही सज्ज आहेत.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर उभारण्यात आलेला आकर्षक मंडप.**

विद्यापीठ प्रशासनाकडून दीक्षांत समारंभाच्या कामासाठी विविध प्रकारच्या समित्या स्थापन करून प्रत्येकाला काम वाटून दिली आहेत. प्रत्येक समित्यांमधील सदस्य आपआपली जबाबदारी पूर्ण करीत आहेत. परीक्षा विभागात तर कामाची लगीनघाई सुरू आहे. दीक्षांत पदवी प्रमाणपत्र विभाग प्रचंड तणावात आहे. पदवी प्रमाणपत्राची अचूक छपाई करण्यासाठी सर्वोतपरी प्रयत्न सुरू आहेत. परीक्षा विभागाकडून विद्यापीठ प्रशासन कायम कामाचा आढावा घेत आहेत. तसेच राज्यपाल येणार असल्याने मोठा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

तरुण भारत संवाद



विद्यापीठातून

### ग्रंथमहोत्सवाच्या स्टॉलवर लगबग

शिवाजी विद्यापीठ दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर आज (दि. १६) सकाळी ७ वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडीला प्रारंभ होणार आहे. ग्रंथदिंडीची सांगता झाल्यानंतर सकाळी ९ वाजता ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. त्यामुळे बुधवारी ग्रंथच्या स्टॉलवर प्रकाशकांच्या कामाची लगबग सुरू होती. आपल्याला पाहिजे तसा स्टॉल उभारण्यासाठी प्रकाशक प्रयत्नशील होते.

16 JAN 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ५१ हजारांवर स्नातकांना मिळणार पदवी

## शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षान्त समारंभ आज; यंदाही मुलींचा टक्का वाढला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



सी. पी. राधाकृष्णन

शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षान्त समारंभ शुक्रवारी (दि. १७) होणार आहे. या कार्यक्रमासाठी पुणे येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे (एनसीएल) संचालक डॉ. आशिष लेले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून अध्यक्षस्थानी कुलपती राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन असतील. विद्यापीठ प्रांगणातील राजमाता जिजाऊ सभागृहात सकाळी ११ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांसह कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन नियंत्रक मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल.

यंदा ५१ हजार ४९२ स्नातकांपैकी १४ हजार २६९ स्नातक प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेणार आहेत. ३७ हजार २२३ स्नातकांना पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्र देण्याचे नियोजन केले आहे. समारंभाची तयारी पूर्ण झाली आहे.

**उच्च पदवीधर होण्यात यंदाही मुलींची बाजी**

यावर्षीही विद्यापीठातील विविध अधिविभागांतून पदवी संपादन करणाऱ्या स्नातकांमध्ये मुलींनी बाजी मारली असून एकूण स्नातकांमध्ये मुलींचे प्रमाण ५५ टक्के आहे. यंदा प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणाऱ्यांमध्ये ५८५६ विद्यार्थी, तर ८४१३ विद्यार्थिनींचा समावेश आहे. उर्वरित ३७ हजार २२३ विद्यार्थ्यांना पोस्टाने दीक्षान्त समारंभादिवशीच पदवी प्रमाणपत्र पाठवण्यात येणार आहे. तसेच यंदा थेट मोबाईलवर पदवी प्रमाणपत्र मिळेल अशी सुविधा उपलब्ध केली आहे.

**सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागात सर्वाधिक उच्च पदवीधर**

यंदा दीक्षान्त समारंभात पदवी प्रमाणपत्र घेणाऱ्या एकूण स्नातकांपैकी सर्वाधिक २० हजार ५०० स्नातक सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागातील आहेत. त्या खालोखाल कॉमर्स अँड मॅनेजमेंट विभाग- १६ हजार ९५२ विद्यार्थी, मानव्यशास्त्र- ११ हजार ४८३, तर अन्य आंतरविद्याशाखेतील २,५३० स्नातकांचा समावेश आहे.



कोल्हापूर : दीक्षांत समारंभानिमित्त शिवाजी विद्यापीठ प्रांगणात उभारण्यात आलेला मंडप. (छाया : मिलन मकानदार)

### प्रमुख अतिथी डॉ. आशिष लेले यांच्याविषयी...



देशात संशोधन क्षेत्रातील प्रतिष्ठेच्या बहुतेक पुरस्कारांचे मानकरी असलेले डॉ. लेले हे अव्वल दर्जाचे संशोधक आहेत. अमेरिकेतील डेलवर विद्यापीठातून त्यांनी पीएच.डी. पदवी मिळवली आहे. शास्त्रज्ञ म्हणून ज्या संस्थेत काम सुरू केले, त्याच एनसीएल संस्थेच्या सर्वोच्चपदी ते विराजमान आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील ७५ शोधनिबंध डॉ. लेले यांच्या नावावर असून, त्यांच्याकडे सहा पेटंट आहेत. दीक्षान्त समारंभात त्यांच्या मार्गदर्शनाविषयी उत्सुकता आहे.

### जय्यत तयारी...


विद्यापीठाच्या मुख्य इमारतीपासून दीक्षान्त कार्यक्रमाच्या राजमाता जिजाऊ सभा मंडपापर्यंत आयोजित केल्या जाणाऱ्या विशेष मिरवणुकीसाठी मंडप उभारला आहे. पदवी प्रमाणपत्र वितरणासाठी ५० स्टॉल आहेत. स्नातकांना कोणत्या बूथवर पदवी प्रमाणपत्र मिळेल याची माहिती मोबाईलवर मेसेजद्वारे मिळणार आहे. त्यामुळे कोणत्याही ठिकाणी गर्दी वा रांग लागणार नाही, याची दक्षता नियोजन समितीने घेतली आहे.

### दृष्टिक्षेपात...

- पदवी प्रमाणपत्र प्रदान कार्यक्रमासह राष्ट्रपती व कुलपती सुवर्णपदक तसेच १६ पारितोषिके, ३८ स्नातकांना पीएच.डी. प्रदान करण्यात येणार आहे.
- प्रमाणपत्र वितरणासाठी ५० स्टॉल
- यावर्षीचे पदवी प्रमाणपत्र इंग्रजीसह मराठी भाषेतून
- प्रमाणपत्र वितरित करण्याची प्रणाली विद्यापीठाकडून विकसित
- विद्यार्थ्यांना मोबाईल फोनवर मिळणार पदवी प्रमाणपत्र
- नावात चुका राहू नयेत, यासाठी प्रत्येक प्रमाणपत्राची तपासणी
- सर्व ५१ हजार प्रमाणपत्रांचे डेटा रेकॉर्ड तयार

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2025
पुढारी

# विद्यापीठाचा उद्या ६१ वा दीक्षान्त समारंभ



**राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन येणार**

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षान्त समारंभ शुक्रवारी (दि. १७) होणार आहे. या समारंभात १४ हजार २६९ स्नातक पदवी प्रमाणपत्र घेणार आहेत. जयसिंगपूरच्या बंडू कोळीला राष्ट्रपती सुवर्णपदक, तर गोव्याच्या क्रिशा अल्दा नोरोन्हा हिला कुलपती सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी ३८ पीएच.डी. आणि १६ विशेष पारितोषिके देण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमासाठी पुणे येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा 'सीएसआयआर'चे संचालक डॉ. आशिष लेले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, अध्यक्ष स्थान राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन भूषविणार आहेत.

विद्यापीठ प्रांगणातील राजमाता जिजाऊ सभागृहात सकाळी ११ वाजता होणाऱ्या या दीक्षान्त कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी उपस्थित होते. देशातील संशोधन क्षेत्रात प्रतिष्ठेचे समजले पान २ वर ▸

## विद्यापीठाचा उद्या ६१ वा दीक्षान्त समारंभ

जाणारे बहुतेक पुरस्कारांचे मानकरी असलेले डॉ. लेले हे अव्वल दर्जाचे संशोधक आहेत. अमेरिकेतील डेलवर विद्यापीठातून त्यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. शास्त्रज्ञ म्हणून ज्या संस्थेत काम सुरू केले, त्याच एनसीएल संस्थेच्या सर्वोच्चपदी ते विराजमान आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील ७५ शोधनिबंध डॉ. लेले यांच्या नावावर असून, त्यांच्याकडे सहा पेटंटही आहेत. दीक्षान्त समारंभाच्या व्यासपीठावरून ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर संबोधित करणार आहेत. दीक्षान्त समारंभात यंदा ५१ हजार ४९२ स्नातकांपैकी १४ हजार २६९ स्नातक पदवी प्रमाणपत्र घेणार आहेत; तर ३७ हजार २२३ स्नातकांना पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्र देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यावर्षीचे राष्ट्रपती सुवर्णपदक जयसिंगपूरच्या बंडू कोळी, तर कुलपती सुवर्णपदक गोव्याच्या क्रिशा अल्दा नोरोन्हा यांना प्रदान करण्यात येणार आहे. दरम्यान, दीक्षान्त समारंभाची सर्व तयारी पूर्ण झाली असून, गुरुवार, दि. १६ जानेवारी रोजी ग्रंथमहोत्सव व ग्रंथदिंडीने दीक्षान्त समारंभातील विविध कार्यक्रमांना सुरुवात होणार आहे.

16 JAN 2025
सकाळ

# राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन उद्या कोल्हापुरात

**कोल्हापूर :** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन शुक्रवारी (ता. १७) जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ होणार आहे. शुक्रवारी (ता. १७) सकाळी १०.२५ वाजता त्यांचे विमानतळावर आगमन होईल. १०.४५ वाजता ते शिवाजी विद्यापीठात येतील. दुपारी ११ ते १२.१५ या वेळेत ते विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभास उपस्थित राहतील. त्यानंतर दुपारी १.१५ वाजेपर्यंत ते विद्यापीठाच्या अतिथिगृहात थांबतील. दुपारी १.३५ वाजता ते विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.



**सी. पी. राधाकृष्णन**

16 JAN 2025

तरुण भारत

# राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन उद्या कोल्हापुरात

**कोल्हापूर :** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन कोल्हापूर



जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. १७ जानेवारी रोजी सकाळी १०.२५ वाजता कोल्हापूर विमानतळ येथे आगमन व राखीव. सकाळी १०.३० वाजता कोल्हापूर विमानतळ येथून प्रयाण. सकाळी १०.४५ वाजता शिवाजी विद्यापीठात आगमन व राखीव. सकाळी ११ ते १२.१५ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभास उपस्थिती. दुपारी १२.१५ ते १.१५ वाजता राखीव. (स्थळ : गेस्ट हाऊस, शिवाजी विद्यापीठ) दुपारी १.१५ वाजता शिवाजी विद्यापीठ येथून कोल्हापूर विमानतळाकडे प्रयाण. दुपारी १.३५ वाजता विमानाने मुंबईकडे प्रयाण असा त्यांचा दौरा आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2025
पुढारी

# राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन उद्या जिल्हा दौऱ्यावर

**कोल्हापूर :** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन शुक्रवारी जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत. दि.१७ रोजी सकाळी १०.२५ वाजता कोल्हापूर विमानतळावर त्यांचे शासकीय विमानाने आगमन होईल. सकाळी १०.४५ वाजता त्यांचे शिवाजी विद्यापीठात आगमन होईल. सकाळी ११ ते १२.१५ या कालावधीत शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभास ते उपस्थित राहणार आहेत. दुपारी १२.१५ ते १.१५ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या गेस्ट हाऊसवर ते थांबणार आहेत. यानंतर दुपारी दीड वाजता कोल्हापूर विमानतळावरून ते मुंबईकडे रवाना होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2025
पुढारी

# राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन उद्या कोल्हापुरात

**कोल्हापूर :** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा कार्यक्रम असा, शुक्रवार दि. १७ जानेवारी रोजी सकाळी १०.२५ वाजता कोल्हापूर विमानतळ येथे आगमन व राखीव. सकाळी १०.३० वाजता कोल्हापूर विमानतळ येथून प्रयाण. सकाळी १०.४५ वाजता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे आगमन व राखीव. सकाळी ११ ते १२.१५ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभास उपस्थिती. दुपारी १२.१५ ते १.१५ वाजता राखीव (स्थळ : गेस्ट हाऊस, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर). दुपारी १.१५ वाजता शिवाजी विद्यापीठ येथून कोल्हापूर विमानतळाकडे प्रयाण. दुपारी १.३० वाजता कोल्हापूर विमानतळ येथे आगमन व राखीव. दुपारी १.३५ वाजता विमानाने मुंबईकडे प्रयाण.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2025
लोकमत

# विद्यापीठाची हब अँड स्पोकसाठी निवड

**कोल्हापूर** : एएनआरएफच्या हब अँड स्पोकसाठी शिवाजी विद्यापीठाची निवड केल्याची माहिती प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी दिली. पाटील म्हणाले, पेअर कार्यक्रमांतर्गत संशोधन करण्यासाठी एएनआरएफकडून हब अँड स्पोक उपक्रम राबविला जातो. त्याअंतर्गत देशभरातील मोजक्या विद्यापीठांमध्ये शिवाजी विद्यापीठाची निवड झाली आहे. यामुळे विद्यापीठाला संशोधन प्रकल्पांसाठी निधी मिळेल.

जनसंपर्क कक्ष
16 JAN 2025
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची हब अँड स्पोकसाठी निवड

**कोल्हापूर :** देशातील नामांकित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (एएनआरएफ)च्या हब अँड स्पोकसाठी शिवाजी विद्यापीठाची निवड करण्यात आली आहे. जानेवारी महिन्याच्या शेवटाला त्यांच्याकडे पाठवलेले दोन प्रोजेक्ट मान्य होतील आणि संशोधनाला चालना मिळेल, अशी माहिती प्र–कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली.

डॉ. पाटील म्हणाले, पेअर कार्यक्रमांतर्गत संशोधन करण्यासाठी विद्यापीठाकडून एएनआरएफकडून हब अँड स्पोक उपक्रम राबविला जातो. त्याअंतर्गत देशभरातील मोजक्या विद्यापीठांमध्ये शिवाजी विद्यापीठाची निवड झाली आहे. त्यामुळे विद्यापीठाला विविध संशोधन प्रकल्प करण्यासाठी निधी मिळणार आहे.

16 JAN 2025 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिंडीसह ग्रंथ महोत्सवाचे दालन आजपासून खुले

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दीक्षान्त समारंभानिमित्त दोन दिवसीय ग्रंथ महोत्सवाचे दालन गुरुवारी (दि. १६) खुले होणार आहे. यंदा ग्रंथ महोत्सवाचे १८ वे वर्ष आहे. गुरुवारी सकाळी साडेसात वाजता राजारामपुरी येथील कमला कॉलेज येथून ग्रंथ दिंडीला प्रारंभ होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथ दिंडीचे उद्घाटन होईल.

कमला कॉलेज, राजारामपुरी, आईचा पुतळा, सायबर चौक, शिवाजी विद्यापीठ गेट क्रमांक ८ मार्गे ही दिंडी विद्यापीठाच्या प्रांगणात आल्यानंतर ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. राजमाता जिजाऊ सभा मंडपाजवळ अॅनेक्स इमारत प्रांगणात उभारलेल्या मंडपात पुस्तकांचे ४० स्टॉल आहेत. यामध्ये विविध विषयांवरील पुस्तके खरेदी करता येतील. १६ व १७ जानेवारी या दोन दिवशी सकाळी ९ ते रात्री ९ यावेळेत हा ग्रंथ महोत्सव सुरू राहणार आहे. गुरुवार, १६ रोजी सकाळी ११ वाजता शास्त्रीय गायिका डॉ. साधना शिलेदार यांच्या आवाजात 'तुकोबांची अभंगवाणी' हा कार्यक्रम सादर होणार आहे.

16 JAN 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जयसिंगपूरच्या बंडू कोळीला सुवर्णपदक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षांत समारंभ शुक्रवारी (दि. १७) होणार असून २०२३-२४ वर्षातील राष्ट्रपती सुवर्णपदक जैव रसायनशास्त्र अधिविभागातील


आशिष लेले

विद्यार्थी जयसिंगपूरचा बंडू राजू कोळी यांना, तर कुलपती सुवर्णपदक मानसशास्त्र अधिविभागातील विद्यार्थिनी गोव्याची क्रिशा अल्दा नोरोन्हा यांना बुधवारी जाहीर झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत त्याची घोषणा केली.

विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ उद्या शुक्रवारी राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात सकाळी ११


बंडू कोळी


क्रिशा नोरोन्हा

वाजता कुलपती तथा राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक आशिष लेले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव उपस्थित होते.

खानावळचालकाच्या मुलाची 'सुवर्ण' भरारी -/ हॅलो पान ३



## दृष्टिक्षेपात विद्यार्थी

**उपस्थित राहून पदवी घेणारे**

| | |
|---|---|
| विद्यार्थी | ५८५६ |
| विद्यार्थिनी | ८४१३ |

**पोस्टाद्वारे पदवी देण्यात येणारे**

| | |
|---|---|
| विद्यार्थी | १७०४१ |
| विद्यार्थिनी | २०१८२ |

**१८** पारितोषिकप्राप्त विद्यार्थी

**३८** पीएच.डी प्राप्त स्नातक

**५१४९२** एकूण विद्यार्थी

## दीक्षांत समारंभाची वैशिष्ट्ये अशी

१. यंदाच्या दीक्षांत समारंभासाठी नोंदणी केलेल्या सर्व ५१४९२ विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाइन स्वीकारले आहेत.

२. यावेळी प्रथमच द्विभाषिक पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार

३. अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संयुक्त पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत.

# खानावळचालकाच्या मुलाची 'सुवर्ण'भरारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** घरात शिक्षणाची पार्श्वभूमी नाही. मात्र, माझ्यासहित बहीण, भाऊ उच्चशिक्षण घेत आहेत. याच शिक्षणाचा उपयोग देशाला होण्यासाठी व्हायरॉलॉजी, कॅन्सरवर पीएच.डी. पूर्ण करून स्टार्टअप सुरू करणार असल्याचा मानस शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रपती सुवर्णपदक विजेते विद्यार्थी बंडू राजू कोळी याने बुधवारी व्यक्त केला.

राष्ट्रपती सुवर्णपदक जाहीर झाल्यानंतर बंडूसहित त्याचे कुटुंबही हरखून गेले. वडील राजू, आई राजश्री जयसिंगपूर येथे खानावळ चालवतात. लहानपणापासून बंडूने खानावळीत मदत करीत शिक्षण पूर्ण केले. जयसिंगपूरमधील चंद्रनारायण बलदवा हायस्कूलमध्ये प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. दहावी व बारावीचे शिक्षण गावातीलच जनतारा कल्पवृक्ष विद्यामंदिरमध्ये, सांगली येथील विलिंग्डन कॉलेजमध्ये बीएस्सी पूर्ण केले. सध्या एमएस्सी बायोकेमेस्ट्रीच्या दुसऱ्या वर्षात तो शिक्षण घेत आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधन कार्यशाळा, परिषदेत त्याने अनेक संशोधन प्रकल्प सादर केले. २०२२ मध्ये त्याला बायोलॉजी सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने बेस्ट स्टुडंट इन बायोटेक्नॉलॉजी अँण्ड मायक्रोबायोलॉजी अवॉर्ड दिला होता. महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठ, कॉलेजकडून राज्य पातळीवरील अवॉर्ड मिळाल्याचे बंडूने आवर्जून सांगितले. बेस्ट एनएनएस कॅंडिडेट हा विद्यापीठाचा अवॉर्ड मिळाला होता. याचीच दखल घेत आता राष्ट्रपती सुवर्णपदक जाहीर केल्याचे तो म्हणाला. त्याला डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. ज्योती जाधव, डॉ. पी. के. पवार, पद्मा दांडगे, डॉ. एस. एस. काळे यांचे मार्गदर्शन लाभले.

## कशासाठी दिले जाणार सुवर्णपदक

१. राष्ट्रपती सुवर्णपदक सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये क्रीडा, बौद्धिक, कला क्षेत्र, एनसीसी, एनएसएस यामधील गुणवत्ता, व्यक्तिमत्त्व, शारीरिक आरोग्य, भाषा शुद्धता, सर्वसाधारण ज्ञान, वागणूक व नेतृत्व गुण यामध्ये आदर्श ठरल्याबद्दल बंडू कोळी यांना प्रदान करण्यात येणार आहे.

२. कुलपतींचे सुवर्णपदक मार्च-२०२४ मध्ये सर्व एम. ए. परीक्षांमधून मानसशास्त्र या विषयात सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल क्रिशा अल्दा नोरोन्हा हिला प्रदान करण्यात येणार आहे.

## प्रसिद्धीपासून दूर, साधा फोटोही नाही

सध्या सोशल मीडियाच्या सर्व प्लॅटफॉर्मवर तरुणाई झळकत असताना त्यांचे ढिगाने फोटो या प्लॅटफॉर्मवर पाहायला मिळतात. मात्र, राष्ट्रपतींचे सुवर्णपदक जाहीर झाल्यानंतर बंडू कोळीकडे माध्यमांना देण्यासाठी साधा फोटोही नव्हता, हे विशेष. यावरून या विद्यार्थ्यांचे साधेपण लक्षात येते.

16 JAN 2025 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बंडू कोळी, क्रिशा नोरोन्हा सुवर्णपदकाचे मानकरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभातील प्रमुख महत्त्वाच्या पारितोषिकांमध्ये बायोकेमिस्ट्री विभागातील बंडू कोळी या जयसिंगपूर येथील विद्यार्थ्याने राष्ट्रपती सुवर्णपदकावर नाव कोरले. मूळची गोवा येथील मानसशास्त्र विभागाची क्रिशा अल्दा नोरोन्हा ही विद्यार्थिनी कुलपती सुवर्णपदकाची मानकरी ठरली.

गेल्या शैक्षणिक वर्षात क्रीडा, कला, एनसीसी, एनएसएस, शारीरिक आरोग्य, भाषा, गुणवत्ता, नेतृत्व अशा सर्वांगीण क्षेत्रात आदर्श ठरल्याबद्दल बंडू कोळी यांची निवड करण्यात आली. मानसशास्त्र विषयात एमएम परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल क्रिशा नोरोन्हा हिची निवड करण्यात आली. या दोन्ही सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आह

## मेसचालकांचा मुलगा बंडू कोळीला व्हायचेय संशोधक



बंडू कोळी

बायोकेमिस्ट्रीच्या द्वितीय वर्षात शिकत असलेल्या बंडू कोळी याला पीएच.डी.सह संशोधनात स्टार्टअप सुरू करण्याचे स्वप्न आहे. संशोधनात आजवर त्याने अनेक प्रयोग केले असून राज्यपातळीवर पुरस्काराचाही तो मानकरी ठरला आहे. बंडूचे वडील राजू व आई राजश्री जयसिंगपूर येथे मेस चालवतात. बंडूने अत्यंत कष्टातून शिक्षण घेतले आहे. शालेय व महाविद्यालयीन वयात अभ्यासातून वेळ काढून तो आई-वडिलांना मेसमध्ये मदत करत असे. जयसिंगपूरमधील बलदवा हायस्कूल, कल्पवृक्ष विद्यामंदिरमध्ये त्याने शिक्षण घेतले.

बंडूला संशोधनात रस असून स्टार्टअप सुरू करून प्राध्यापक व्हायचे आहे. आजपर्यंत त्याने अनेक राष्ट्रीय परिषदेत सहभाग घेतला आहे. बायोलॉजी सोसायटी ऑफ इंडियातर्फे त्याला बेस्ट स्टुडंट अॅवॉर्ड मिळाला आहे. त्याच्या याच कामाची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठातर्फे राष्ट्रपती सुवर्णपदकासाठी त्याची निवड करण्यात आली आहे.

## चाईल्ड सायकॉलिजिस्ट क्रिशाला संशोधनात स्वारस्य



क्रिशा नोरोन्हा

कुलपती सुवर्णपदक विजेती क्रिशा अल्दा नोरोन्हा ही मूळची गोव्याची आहे. तिला सुरुवातीपासूनच मानसशास्त्रामध्ये शिक्षण घेऊन काम करण्याची इच्छा होती; मात्र गोव्यामध्ये मानसशास्त्र विषयांमध्ये शिक्षण देणाऱ्या संस्था नसल्याने तिने शिवाजी विद्यापीठातील मानसशास्त्र विभागात प्रवेश घेतला. मानसशास्त्र या विषयात क्रिशाने विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावत यश मिळवले. सध्या ती बेंगलोर येथील एका संस्थेमध्ये चाईल्ड सायकॉलॉजिस्ट म्हणून काम करत आहेत. भविष्यात तिला लहान मुलांच्या मानसिकतेच्या विषयानुरूप संशोधन करण्यामध्ये स्वारस्य आहे.

16 JAN 2025
तरुण भारत

# बंडू कोळी राष्ट्रपती सुवर्णपदकाचे मानकरी

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार, १७ रोजी सकाळी ११ वाजता राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा संचालक डॉ. आशिष लेले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठातील राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात होणाऱ्या दीक्षांत समारंभात बंडू कोळी याला



बंडू कोळी



नोरोन्हा अल्दा

राष्ट्रपती सुवर्णपदक तर नोरोन्हा क्रिशा अल्दाला कुलपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले आहे. यंदा २२ हजार ८९७ मुलांना तर २८ हजार ५९५ मुलींना पदवी प्रमाणपत्राचे वाटप केले जाणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

पान ९ पहा

## बंडू कोळी राष्ट्रपती सुवर्णपदकाचे मानकरी

पान १ वरून

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. अशिष लेले यांना शांतीस्वरूप भटनागर ॲवॉर्ड मिळाला आहे. त्यांनी युएसएमध्ये पीएच. डी. पदवी घेतली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी पीएच. डी. पदवी पूर्ण केली आहे. त्यांना यंग सायन्टिस्ट ॲवॉर्ड मिळाला आहे. फेलो इंडियन नॅशनल सायन्स ॲकॅडमीचा ॲवॉर्ड मिळाला आहे. इन्फोसेस प्राईज इन इंजिनिअरिंग ॲन्ड कॉम्प्युटर सायन्स, जी. आय. काने गोल्ड मेडल असे अनेक ॲवॉर्ड मिळाले आहेत. त्यांनी संशोधनासह औद्योगिक क्षेत्रातही काम केले आहे.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव म्हणाले, यंदा ५१ हजार ४९२ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र दिले जाणार आहे. यामध्ये १४ हजार २३९ विद्यार्थी प्रत्यक्ष तर ३७ हजार २२३ पोस्टाने पदवी प्रमाण स्वीकारणार आहेत. प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र पदवी प्रमाणपत्र वाटप करण्यासाठी स्टॉल उभारले आहेत. विद्यार्थ्यांना कोणत्या स्टॉलवर पदवी प्रमाणपत्र मिळणार याची माहिती एसएमएसद्वारे मिळणार आहे. तसेच १६ स्नातकांना पारितोषिक देऊन गौरवण्यात येणार आहे. ३८ स्नातकांना प्रत्यक्ष पाहुण्यांच्या हस्ते पीएच. डी. पदवी प्रमाणपत्र दिले जाणार आहे. दीक्षांत समारंभात पहिल्यांदाच इंग्रजी व मराठी भाषेत द्विभाषिक पदवी प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संयुक्त पदवी प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. सर्व पदवी प्रमाणपत्रांची तपासणी करून चुका राहणार नाहीत याची काळजी घेतली आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रावर क्यूआर कोड असणार आहे. त्यामुळे कोठेही पदवी प्रमाणपत्र पडताळणी करण्यास सोपे जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रावर पीआरएन नंबर, आधारकार्ड नंबर आणि एबीसी नंबर असणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अलोक जत्राटकर, ग्रंथालय संचालक डॉ. डी. बी. सुतार, आदी उपस्थित होते.

16 JAN 2025 सकाळ

# बंडू कोळी, क्रिशा नोरोन्हा यांना सुवर्णपदक

## शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षान्त समारंभ उद्या; राज्यपालांची प्रमुख उपस्थिती

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १५ : 'शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षान्त समारंभ शुक्रवारी (ता. १७) सकाळी अकरा वाजता राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात केंद्रीय पद्धतीने होणार आहे.



### प्रमाणपत्रांची माहिती 'एनएडी'वर अपलोड होणार

### एक तास तेरा मिनिटांचा समारंभ

| पदवी घेणारे विद्यार्थी (स्नातक) | |
|---|---|
| विद्याशाखा | विद्यार्थी |
| विज्ञान व तंत्रज्ञान | १७,५३७ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | १९,९५२ |
| मानव्यशास्त्र | ११,७०३ |
| आंतर-विद्याशाखीय | २५६० |
| एकूण | ५१,७५२ |





## आई-वडिलांच्या कष्टाची 'बंडू'च्या यशाला झालर

- बंडू कोळी

## क्रिशाने 'सायन्स' सोडलं अन् मानसशास्त्र स्वीकारलं

मस्ट READ

# इतिहासाच्या नोंदी ठेवणे महाराष्ट्राच्या भल्याचेच : पठारे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** इतिहास हा भविष्यातील घडामोडींसाठी महत्त्वाचा दुवा ठरतो. इतिहासातील नोंदी शब्दबद्ध करणे हे राज्याच्या भल्यासाठी असून, कोल्हापूर : ऐतिहासिक व प्राकृतिक' या पहिल्या खंडाद्वारे कोल्हापुरातून याची सुरुवात झाली ही अभिमानाची गोष्ट आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांनी बुधवारी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्राच्या वतीने डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'कोल्हापूर : ऐतिहासिक व प्राकृतिक' या पंचखंडात्मक इतिहासाच्या पहिल्या खंडाचे प्रकाशन प्रा. पठारे यांच्या हस्ते झाले. विद्यापीठाच्या शाहू सिनेट सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्रा. पठारे म्हणाले, इतिहासातून काहीतरी शिकले पाहिजे. आपल्याकडे इतिहास सांगण्याची परंपरा नाही. तो अजूनही कथा, कादंबऱ्यांमधूनच सांगितला जातो. डॉ. पवार यांनी मात्र आपल्या इतिहास लेखनामध्ये निष्पक्षपाती नोंदींना, वस्तुनिष्ठतेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, कोल्हापूरचा इतिहास अडीच हजार वर्षांपूर्वीचा आहे. या खंडात १७ लेख असून, येथील व्यापार, १८५७ चे बंड यासह विविध विषयांचा यात समावेश आहे. यापुढील खंडांमध्ये साहित्य, सामाजिक आणि कृषी, उद्योग व सहकार या विषयांच्या इतिहासाचा समावेश असेल.

प्र- कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठात डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'कोल्हापूर : ऐतिहासिक व प्राकृतिक' या इतिहास ग्रंथाचे प्रकाशन प्रा. रंगनाथ पठारे यांच्या हस्ते बुधवारी शानदार समारंभात झाले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. विलास शिंदे उपस्थित होते.

## मुश्रीफ यांचा विजय ही तर शाहू विचारांची देण

**कागलमध्ये हसन मुश्रीफ यांच्या समाजाची मते किती? मात्र, तरीही ते सातत्याने विजयी होत आहेत. याला राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक माणूसपणाचे विचार कारणीभूत असल्याचे प्रा. रंगनाथ पठारे यांनी सांगितले. मुश्रीफ यांचा विजय हे शाहू विचारांची प्रचिती असल्याचे पठारे यांनी सांगताच टाळ्यांचा कडकडाट झाला.**

16 JAN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरचा इतिहास प्रकल्प' महाराष्ट्रासाठी पथदर्शक

## ा. रंगनाथ पठारे : डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'कोल्हापूर : ऐतिहासिक व प्राकृतिक' खंडाचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : 'डॉ. सिंगराव पवार यांनी 'कोल्हापूर : हासिक व प्राकृतिक' या इतिहास च्या रूपाने महाराष्ट्रासाठी : पथदर्शक स्वरूपाचा प्रकल्प र केला आहे. त्याचे सर्वत्र ुकरण होणे आवश्यक आहे', े प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. नाथ पठारे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या र्षी शाहू संशोधन केंद्राचे मानद ालक तथा ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ . जयसिंगराव पवार यांनी 'राजर्षी ू साहित्यमाले'अंतर्गत संपादित ेल्या 'कोल्हापूर : ऐतिहासिक प्राकृतिक' या कोल्हापूरच्या पंचखंडात्मक इतिहासाच्या पहिल्या खंडाचे प्रकाशन प्रा. पठारे यांच्या हस्ते करण्यात आले. राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते; तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

प्रा. पठारे म्हणाले, 'डॉ. पवार यांनी या ग्रंथाच्या रूपाने कोल्हापूरचा अनेक दृष्टींनी वेध घेता येईल, असा ऐवज निर्माण केला आहे. त्यांनी शासनाच्या गॅझेटियरच्या मर्यादेपलीकडे जाऊन इतिहासाचा साकल्याने वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. इतिहासापासून धडा घेऊन पुढे जाण्याची भूमिका सजग समाजाने घ्यायला हवी.'

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, 'वीस वर्षांपूर्वी अरुण टिकेकर यांनी पुणे शहराचा साद्यंत इतिहास दोन खंडांत लिहिला. तो पाहिल्यानंतर अशा स्वरूपाचे काम कोल्हापूरच्या इतिहासाच्या संदर्भातही करता येणे शक्य असल्याची जाणीव झाली. सन २००५ मध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी अशा स्वरूपाचे काम आपण हाती घ्यावे, अशी सूचना केली. तत्कालीन कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी सहकार्य केले. त्यातून हा प्रकल्प साकार होतो आहे.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांचे डॉ. जयसिंगराव पवार हे विद्यार्थी असून, आप्पासाहेबांचे विचार व कार्याचा वसा आणि वारसा अत्यंत जबाबदारीने त्यांनी आपल्या खांद्यावर वाहिला आहे. त्यांनी पहिल्या खंडासाठी लिहिलेल्या प्रस्तावनेचे विद्यार्थ्यांनी सामूहिक वाचन करावे.'

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी डॉ. पवार यांच् साहित्याचे महत्त्व विषद केल कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे य आभार मानले.



**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'कोल्हापूर: ऐतिहासिक व प्राकृतिक' या ग्रंथाचे प्रकाशन बुधवारी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्या हस्ते झाले. यावेळी शेजारी डॉ. पवार, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

### कोल्हापूरच्या २५०० वर्षांच्या इतिहासावर प्रकाश

■ 'कोल्हापूर : ऐतिहासिक व प्राकृतिक' या खंडामध्ये कोल्हापूरच्या सुमारे २५०० वर्षांच्या इतिहासावर प्रकाश टाकण्यात आला आहे. विविध विषयतज्ज्ञांनी १७ लेखांच्या माध्यमातून कोल्हापूरच्या प्राचीन व मध्ययुगीन इतिहासासह प्राकृतिक इतिहासाचाही वेध घेतला आहे. यामध्ये ब्रह्मपुरी, करवीर नावाची व्युत्पत्ती, कोल्हापूरचे कोट, जिल्ह्यातील किल्ले, शिवकाळ, महाराणी ताराबाई, करवीरकर महाराणी जिजाबाई, करवीर रियासत, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, छत्रपती घराण्यातील कुलाचार, आदी विषयांवरील लेखांचा समावेश असल्याचे डॉ. पवार यांनी सांगितले.

16 JAN 2025
तरुण भारत



कोल्हापूर : ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'कोल्हापूर: ऐतिहासिक व प्राकृतिक' खंडाचे प्रकाशन करताना साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे, डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

# इतिहासाच्या नोंदी महाराष्ट्राच्या भल्यासाठी

- ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत प्रा. रंगनाथ पठारे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

इतिहासाच्या नोंदी करण्याची परंपरा मुस्लिम राज्यापासून सुरू झाली. या नोंदींपासून बखरीही लिहिल्या गेल्या, पण खरा इतिहास बखरींमध्ये येत नाही. खऱ्या इतिहासाच्या नोंदींची सुरूवात कोल्हापूरपासून झालीय, इतिहासाच्या नोंदी राज्याच्या भल्यासाठी फायदेशीर आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्रातर्फे कोल्हापूरचा पंचखंडात्मक इतिहासाचा प्रकल्प सुरु केला असून त्यातील 'कोल्हापूर: ऐतिहासिक व प्राकृतिक' या पहिल्या खंडाच्या प्रकाशन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या खंडाचे संपादन शाहू संशोधन केंद्राचे संचालक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले आहे. राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात झालेल्या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

प्रा. पठारे म्हणाले, डॉ. जयसिंगराव पवार यांनी सर्वांगिण लिखाण करून कोल्हापुरचा इतिहास या खंडात मांडला आहे. राजर्षी शाहू महाराज यांचा इतिहास संपूर्ण महाराष्ट्राला प्रेरणादायी आहे. डॉ. पवार यांनी हाती घेतलेला कोल्हापूरचा इतिहास मांडणारा प्रकल्प मार्गदर्शक ठरेल. गॅझेटमध्ये जो इतिहास लिहला जातो त्याला मर्यादा येतात. परंतू या खंडातून अचूक नोंदी अभ्यासकाला मिळतील

खंडाचे संपादक डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, हिंदवी स्वराज्याचे मूळ गडकोटमध्ये आहेत. महाराणी ताराराणी यांच्याशिवाय इतिहासच नाही. परंतू राणीसाहेब जिजाबाईंनी वारणेच्या काठावर पेशव्यांचा पराभव केला हा इतिहास जास्त करून कोणालाच माहित नाही. अंबाबाई मंदिर, भवानी मंडप, बिंदू चौक येथेही मोठा इतिहास घडला आहे,

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू अप्पासाहेब पवार यांचे विद्यार्थी डॉ. जयसिंगराव पवार आहेत. एक रूपया मानधनावर गेली १७ वर्षे ते शाहू संशोधन केंद्राचे काम करीत आहेत. तरी डॉ. पवार यांनी पुढील खंडाचा आराखडा तयार करून द्यावा. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अवनिश पाटील, डॉ. मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. व्ही. एम. पाटील, दलितमित्र व्यंकाप्पा भोसले, सुरेश शिपुरकर, आदी उपस्थित होते.

16 JAN 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘कोल्हापूर : ऐतिहासिक व प्राकृतिक’ खंड म्हणजे सर्वांगांनी वेध घेणारा ऐवज

## प्रा. रंगनाथ पठारे यांचे प्रतिपादन; डॉ. जयसिंगराव पवार यांचे लेखन महाराष्ट्रासाठी पथदर्शक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. जयसिंगराव पवार यांचे इतिहास लेखनाला फार मोठे योगदान आहे. ‘कोल्हापूर : ऐतिहासिक व प्राकृतिक इतिहास’ हे खंड म्हणजे कोल्हापूरचा अनेक दृष्टींनी वेध घेता येईल, असा ऐवज आहे. इतिहास ग्रंथांच्या रूपाने केलेला हा प्रकल्प महाराष्ट्रासाठी पथदर्शक ठरेल, त्याचे सर्वत्र अनुकरण व्हावे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्राचे मानद संचालक, ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार यांनी ‘राजर्षी शाहू साहित्यमाले’अंतर्गत संपादित केलेल्या ‘कोल्हापूर : ऐतिहासिक व प्राकृतिक’ या कोल्हापूरच्या पंचखंडात्मक इतिहासाच्या पहिल्या खंडाचे प्रकाशन प्रा. पठारे यांच्या हस्ते झाले. राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर होते. प्र-कुलगुरू डॉ.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. जयसिंगराव पवार संपादित ‘कोल्हापूर : ऐतिहासिक व प्राकृतिक’ या इतिहास ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून उपस्थित डॉ. पवार, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे. (छाया : मिलन मकानदार)**

प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. प्रा. पठारे म्हणाले, खरे तर इतिहास नोंद करीत असताना त्यात पक्षपात असू नये. मात्र, इतिहासात एक तर विजेत्यांच्या नोंदी असतात किंवा तो कोणत्या तरी एका बाजूला झुकलेला असतो. डॉ. पवार यांनी मात्र इतिहास लेखनात निष्पक्षपाती नोंदींना, वस्तुनिष्ठतेला सर्वोच्च प्राधान्य दिलेले आहे. हे त्यांचे इतिहास लेखनाला फार मोठे योगदान आहे. शासनाकडून गॅझेटियरच्या स्वरुपात अशा स्वरुपाचे दस्तावेजीकरण होत असते. मात्र, डॉ. पवार यांनी गॅझेटियरच्या मर्यादेपलिकडे जाऊन इतिहासाचा साकल्याने वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, वीस वर्षांपूर्वी अरुण टिकेकर यांनी पुणे शहराचा साद्यंत इतिहास दोन खंडांत लिहिला. अशा स्वरुपाचे काम कोल्हापूरच्या इतिहासाच्या संदर्भातही करता येणे शक्य असल्याची जाणीव झाली. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी हे काम आपण हाती घ्यावे, अशी सूचना केली. विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी त्याला सर्वोतोपरी सहकार्य करण्याची भूमिका घेतली. त्यातून हा प्रकल्प साकारला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, पहिले कुलगुरू तथा इतिहासाचे अभ्यासक डॉ. आप्पासाहेब पवार यांचे डॉ. जयसिंगराव पवार हे विद्यार्थी. आप्पासाहेबांचा विचार व कार्याचा वसा आणि वारसा अत्यंत जबाबदारीने त्यांनी आपल्या खांद्यावर वाहिला आहे. डॉ. पवार यांनी पहिल्या खंडासाठी लिहिलेल्या अत्यंत अभ्यासपूर्ण प्रस्तावनेचे विद्यार्थ्यांनी सामूहिक वाचन करावे.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

### कोल्हापूरच्या २५०० वर्षांच्या इतिहासावर प्रकाश

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, या खंडात कोल्हापूरच्या सुमारे २५०० वर्षांच्या इतिहासावर प्रकाश टाकला आहे. प्राचीन व मध्ययुगीन इतिहासासह प्राकृतिक इतिहासाचाही वेध घेतला आहे. यामध्ये ब्रह्मपुरी, करवीर नावाची व्युत्पत्ती, कोल्हापूरचे कोट, किल्ले, शिवकाळ, महाराणी ताराबाई, करवीरकर महाराणी जिजाबाई, १८५७ चा स्वातंत्र्यलढा आणि चिमासाहेब महाराज, करवीर रियासत, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, संस्थानातील स्वातंत्र्यलढा, कोल्हापूर भूगोल, वनस्पतीसंपदा, प्राणिसंपदा आणि पक्षीसंपदा या विषयांवरील लेखांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2025
पुढारी

# साधना शिलेदार यांच्याकडून संत तुकारामांच्या अभंगांना स्वरसाज

## शिवाजी विद्यापीठात आज कार्यक्रमाचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



महाराष्ट्राची वारकरी परंपरा बहुप्रसवी वाणीने समृद्ध करणारे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या आजवर संगीतबद्ध न केलेल्या काही निवडक अभंगांना संगीतबद्ध करून रसिकांना सादर करण्याची कामगिरी शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाने केली आहे.

संत तुकाराम महाराजांच्या अनेक रचनांवर अद्याप सांगितिक स्वरसाज चढविलेला नाही. अशा दहा निवडक अभंग रचना स्वरबद्ध करण्याचे काम अध्यासनामार्फत करण्यात आले. गायिका डॉ. शिलेदार यांनी त्यांचे गायन केले आहे. त्याचप्रमाणे या रचना त्यांच्यासह श्रीकांत पिसे, राहुल एकबोटे, संकेत नागपूरकर, दीपश्री पाटील या संगीतकारांनी संगीतबद्ध केल्या आहेत. दीक्षांत समारंभानिमित्त 'तुकोबांची अभंगवाणी' या नावाने असलेली चित्रफीत व ध्वनिमुद्रणाचे प्रकाशन १६ जानेवारी रोजी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. सकाळी ११ वाजता संत तुकाराम अध्यासन आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित कार्यक्रमामध्ये डॉ. साधना शिलेदार यांचा विशेष गायन कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमास निवेदक म्हणून सांगोल्याचे ह.भ.प. ज्ञानेश्वर बंडगर उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2025
पुढारी

# 'एक तास वाचनाचा' उपक्रमास प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्य शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहात 'एक तास वाचनाचा' उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला विद्यार्थिनींचा प्रतिसाद लाभला.

अधिक लोकांपर्यंत वाचन संस्कृती पोहोचावी, विद्यार्थ्यांपर्यंत पुस्तके पोहोचावीत व वाचनसंस्कृती दृढ व्हावी या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये 'एक तास वाचनाचा' उपक्रम झाला. यामध्ये विद्यार्थिनींनी आवडीची पुस्तके वाचली. पुस्तकांचे रसग्रहण लिहून दिल्यानंतर त्यातून तीन क्रमांक काढले जाऊन हॉस्टेल डे कार्यक्रमात पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे.

वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी आयोजन केले. अधीक्षक प्रा. कविता वड्राळे, नाईट वार्डन सुनीता पावर, शीला सोनवणे, विद्या माने, वंदना पाटील, आदी उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागामध्ये 'रंग-संगीत : प्रस्तावना व परिचय' नाट्य व संगीतविषयक दोन दिवसीय कार्यशाळा झाली. यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात संगीत व नाटकांचे गाढे अभ्यासक तथा तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. साईश देशपांडे (गोवा) यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा झाली. त्यांनी सहभागी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले.

अभिनय करत असताना नाटकामध्ये संगीताचा वापर कसा करावा, संगीताचे महत्त्व, शारीरिक हालचालीतून, संवादातून संगीत कसे निर्माण होते, पार्श्वसंगीताचा आधार कसा घ्यावा, स्वर, आवाजाची पट्टी, लय, ताल या मूलभूत सांगितिक घटकांनुसार संवादाचे सादरीकरण, उच्चारण कसे असावे आदी अनेक घटकांच्या अनुषंगाने डॉ. देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. रविदर्शन कुलकर्णी यांनी परिचय करून दिला. महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेतील डॉ. संजय तोडकर दिग्दर्शित भाऊबंदकी नाटकातील यशस्वी विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. राजश्री खटावकर यांनी आभार मानले.

16 JAN 2025
तरुण भारत

# भुयारी मार्गाचे काम पूर्णत्वाकडे

- लवकरच भुयारी मार्गाचे लोकार्पण
- तीन फुटांखालील वाहने, पादचाऱ्यांसाठी बारा महिने उपलब्ध राहणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाला पूर्व व पश्चिम भागाला जोडणारा भुयारी मार्गासाठी राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने साडेआठ कोटी रूपये मंजूर केले. शंभर टक्के अनुदान उपलब्ध करून दिल्याने भुयारी मार्गाचे काम वेळेत पूर्ण करता आले. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि शिवाजी विद्यापीठाने नेमलेल्या तज्ज्ञ अभियंत्यांनी तयार केलेल्या डिझाईननुसार हे काम पूर्ण झाले आहे. लवकरच या भुयारी मार्गाचा लोकार्पण सोहळा केला जाणार आहे.

शिवाजी विद्यापीठातील भुयारी मार्गाने तीन मीटर उंचीपर्यतची वाहने जाऊ शकतात. त्यापेक्षा जास्त उंचीची वाहने आत जाऊ नये म्हणून दोन्ही बाजूला गार्ड लावले आहेत. हा भुयारी मार्ग हलकी वाहने व पादचाऱ्यांसाठी आहे. पादचाऱ्यांसाठी संपूर्ण लांबीचा फुटपाथ तयार केला आहे. या कामामध्ये भुयारी मार्गाचे रस्ते, फुटपाथ व जुना कोल्हापूर-बेळगाव महामार्ग यावर स्लॅप टाकताना वाहतूक व्यवस्था विना अडथळा सुरू होती.

भुयारी मार्गातून जाणाऱ्या वाहनांमुळे पादचाऱ्यांना इजा होऊ नये याकरिता पादचारी मार्गाच्या दोन्ही बाजूने रेलींग




करण्यात येणार आहे. रस्त्यांच्या जंक्शनला मानकानुसार रंबलर स्ट्रिप्सची तरतूद करण्यात येणार आहे. संपूर्ण भुयारी मार्गाला रात्रीच्या वेळी पुरेसा प्रकाश मिळावा याकरिता विजेची तरतूद केली आहे. त्याला मोशन सेंसर बसवण्यात येणार असून, गाडी आल्यानंतरच लाईट लागेल. परिणामी, ऊर्जा बचत होईल.

भुयारी मार्गाचे काम बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्यात आले असून, हे काम ठेकेदार अरिहंत कन्स्ट्रक्शनमार्फत केले आहे. विद्यापीठाच्या बांधकाम समितीचे तज्ज्ञ सदस्य आर्किटेक्ट महेश डोईफोडे, इंजिनियर सदानंद सबनीस, इंजिनिअर गिरीष कुलकर्णी, रमेश पवार, अभियांत्रिकी विभागामार्फत रणजीत यादव, अमित कांबळे यांनी उत्कृष्ट दर्जाचे काम होण्यासाठी कष्ट घेतले. त्यासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि व्यवस्थापन समितीच्या सदस्यांचे मार्गदर्शन लाभले.

### भुयारी मार्गात पाणी साचणार नाही

भुयारी मार्गाला पावसाच्या पाण्याचा अडथळा होऊ नये व पाण्याचा उत्तम निचरा व्हावा यासाठी हे डिझाईन केले आहे. भुयारी मार्गात पाणी साचणार नाही व कितीही मोठा पाऊस आला तरी वर्षभर भुयारी मार्ग वापरासाठी उपलब्ध राहील, अशी पाणी निचरा यंत्रणा येथे कार्यान्वित केली आहे. भविष्यात या भुयारी मार्गातून वाहून जाणारे पाणी विद्यापीठ परिसरात बांध घालून अडवण्याचा विद्यापीठ प्रशासनाचा मानस आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मुख्य इमारतीला दोन्ही बाजूंनी जोडणाऱ्या भुयारी मार्गाचे काम पूर्ण झाले आहे. या भुयारी मार्गाचा लोकार्पण होणार आहे. त्यापुर्वी या मार्गावर अखेरचा हात फिरवताना कर्मचारी. (छाया : रियाज ट्रेनर)

16 JAN 2025

सकाळ

# इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्ससोबत शिवाजी विद्यापीठ करणार संशोधन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १५ : केंद्र सरकारचे डिपार्टमेंट ऑफ सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी राष्ट्रीय पातळीवर 'हब अॅन्ड स्पोक' उपक्रम राबवित आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाला 'स्पोक' म्हणून इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या 'हब' असलेल्या संस्थे समवेत काम करण्याची मोठी संधी मिळाली असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली.

संशोधनाची गुणवत्ता पाहून विद्यापीठाची 'स्पोक' म्हणून इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सने निवड केली आहे. त्याने विद्यापीठातील विज्ञान शाखेतील अधिविभाग, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या संशोधनाला गती मिळणार आहे. विद्यापीठाची ही कामगिरी ऐतिहासिक स्वरूपातील असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

या प्रकल्पात निवड झालेल्या विद्यापीठांना संशोधनसाठी अनुदान मिळणार आहे. त्यासाठी संशोधन संकल्पनांबाबतचे विषय निश्चित करून ते हब असलेल्या संस्थेला सादर करायचे आहे. त्यासाठी आपल्या विद्यापीठातील विज्ञान शाखेतील सर्व अधिविभागांनी एकत्रित येऊन ऊर्जा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता असे दोन विषय निश्चित केले आहेत.

ते या महिन्याअखेरपर्यंत 'एएनआरएफ'ला सादर केले जातील. या प्रकल्पाची मुदत पाच वर्षे आहे. 'स्पोक' म्हणून निवड करण्यासाठी आयआयटी इंदौर, आंध्र प्रदेशमधील विद्यापीठ अशा विविध सात शैक्षणिक संस्थांनी तयारी दर्शविली होती. मात्र, आमचा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्ससमवेत जोडण्याचा प्रयत्न होता. त्यानुसार पाठपुरावा केला आणि त्याला मिळाले असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सांगितले.

16 JAN 2025 सकाळ

# पदवीधर होण्यात मुलींची आघाडी यंदाही कायम

## यंदा मुलांच्या तुलनेत ५,६९८ इतकी जादा संख्या

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठातून पदवीधर होण्यात यावर्षीदेखील कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील मुलींनी आघाडी कायम राखली आहे. यंदा २८,५९५ मुली पदवी घेणार असून, त्यांचे प्रमाण मुलांच्या तुलनेत ५,६९८ इतक्या संख्येने अधिक आहे.

विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षान्त समारंभात पदवी स्वीकारणाऱ्या मुलींची संख्या १९९ होती. सन १९८४ मध्ये ती ३,२६८ झाली. त्यानंतर पदवीधर होण्यातील मुलींची संख्या वर्षागणिक वाढत राहिली. ज्या मुलींचे विवाहानंतर शिक्षण थांबते, त्यांना शिक्षणासाठी असलेल्या सुविधांची माहिती मिळावी, यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या मदतीने प्रबोधन करण्यात आले.

विद्यापीठाच्या कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हा या कार्यक्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण १८ टक्के होते. आता हे प्रमाण ५५. ५३ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. त्यातून मुलींचा उच्च शिक्षणातील टक्का वाढत असल्याचे स्पष्ट होत आहे.

**गेल्या ६० वर्षांत पदवी घेणाऱ्या विद्यार्थिनींचे प्रमाण**

| वर्ष | पदवी घेणारे एकूण विद्यार्थी | त्यातील विद्यार्थिनींची संख्या (कंसात टक्केवारी) |
|---|---|---|
| १९६४ | १०९४ | १९९ (१८.१९ टक्के) |
| १९७४ | १००५१ | १६६३ (१६.५५टक्के) |
| १९८४ | १२६२८ | ३२६८ (२५.८८टक्के) |
| १९९४ | २४९३५ | ७८१७ (३१.३५टक्के) |
| २०१८ | ५०४४४ | २६९३८ (५३.४०टक्के) |
| २०२२ | ६२३६० | ३२५२० (५२.१५टक्के) |
| २०२३ | ४९४३८ | २७४७५ (५५.७८ टक्के) |
| २०२४ | ५१४९२ | २८५९५ (५५.५३ टक्के) |

**यावर्षी विद्याशाखानिहाय पदवी घेणारे विद्यार्थी**

| विद्याशाखा | मुले | मुली |
|---|---|---|
| विज्ञान व तंत्रज्ञान | १०६८३ | ९८५४ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | ६३५८ | १०५९४ |
| मानव्यशास्त्र | ५०७३ | ६४०० |
| आंतरविद्याशाखीय | ७८३ | १७४७ |
| एकूण | २२८९७ | २८५९५ |

16 JAN 2025 सकाळ

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
NAAC 'A++' Grade

## ६१ वा दीक्षांत समारंभ विद्यार्थ्यांसाठीची अधिसूचना

१) विद्यापीठाचा ६१ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहूउद्देशिय सभागृहात शुक्रवार, दि. १७ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न होत आहे. या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून मा. श्री. सी. पी. राधाकृष्णन राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व कुलपती शिवाजी विद्यापीठ तसेच प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आशीष लेले, मा. संचालक सीएसआयआर – राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे, हे उपस्थित राहणार आहेत.

२) ६१ वा दीक्षांत समारंभ केंद्रीय पद्धतीने विद्यापीठात संपन्न होणार आहे.

३) दीक्षांत समारंभासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आवाहनानुसार व विद्यापीठ अधिकार मंडळाने निश्चित केल्याप्रमाणे पांढऱ्या रंगाचा शर्ट (पुरुषांसाठी) तर पांढऱ्या/मोती रंगाची जरीची साडी किंवा सलवार कुर्ता (महिलांसाठी) असा पोषाख परिधान करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

४) विद्यापीठ परिसरात विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी फोटो काढत असताना फक्त विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या मानवस्त्राचा वापर करुन फोटो काढावेत. अन्य कोणत्याही प्रकारचे गाऊन व टोपीचा वापर करू नये.

५) दीक्षांत समारंभासाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मानवस्त्राची परतावा अनामत रक्कम रु.६५०/– आणि भाडे ना परतावा रु. २५/– आकारण्यात येणार आहे.

६) ज्या विद्यार्थ्यांनी टपालाद्वारे (By Post) पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्याचा विकल्प अर्ज भरताना निवडला आहे. त्यांची पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारंभ संपन्न झालेवर अर्जावरील पत्यावर पोस्टाने पाठविण्यात येतील.

७) सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी, अर्ज भरताना In person असा विकल्प निवडला आहे. अशा स्नातकांची पदवीप्रमाणपत्रे, विद्यापीठामध्ये दीक्षांत समारंभादिवशी सकाळी ७:३० ते ११:०० या वेळेत आणि समारंभ संपल्यानंतर सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत विद्यापीठामध्ये परीक्षा भवन क्रं.२ या ठिकाणी वितरण व्यवस्थेद्वारे वितरीत केली जातील. (स्नातकांनी पदवीप्रमाणपत्र स्वीकारताना शासकीय ओळखपत्र (आधारकार्ड/ पॅनकार्ड/मतदान ओळखपत्र इ. यापैकी एक) वितरण अधिकारी यांना दाखवून पदवी प्रमाणपत्रे प्राप्त करावीत.)

८) ६१ व्या दीक्षांत समारंभासाठीच्या व्यासपीठावर देण्यात येणाऱ्या, पीएच.डी. व पारितोषिक प्राप्त स्नातकांची यादी व पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/61convocation) या सदरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

९) पदवीप्रमाणपत्र क्रमांक माहितीसाठी विद्यापीठ संकेत स्थळावर खाली दिलेल्या लिंकचा वापर करावा.

link -https://studentapps.unishivaji.ac.in/findbooth/

दीक्षांत विभाग

दि.१६/१/२०२५

डॉ. अजितसिंह एन. जाधव
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ